# अभ्यास सहल

जळगाव : येथील मू.जे. महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांची अभ्यास सहल कर्मचारी प्रोत्साहन योजनेंतर्गत नुकतीच काढण्यात आली.



प्रशासकीय कामकाजातील ताणतणावातून विरंगुळा मिळावा, कर्मचा-यांना विविध विषयांचे ज्ञान मिळावे, याकरिता केसीई सोसायटीच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कर्मचारी प्रोत्साहन योजनेंतर्गत ही अभ्यास सहल काढण्यात आली होती. यात अलिबाग, मुरुड, जंजिरा येथील शिवकालीन किल्ले, त्यांचा ऐतिहासिक वारसा तसेच तेथील स्थापत्यकलेचा अभ्यासही शिक्षकेतर कर्मचार्यांनी केला. पाली येथील श्री बल्लाळेश्वर गणेश मंदिरालाही भेट दिली.

दौर्यासाठी सहल नियोजन समितीचे प्रमुख व महाविद्यालयाचे कुलसचिव डॉ.जगदीप बोरसे, संतोष पाटील, राजेश बागुल, सुभाष तळेले, राजेंद्र भालेराव यांनी परिश्रम घेतले.